**प्रेसनोट** **दिनांक ०२/०५/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**लोकसहभागातून सुरक्षेकडे या संकल्पनेअंतर्गत लोकसहभागातून येरवडा पो.स्टे.चे हद्दीत सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेत आले.**

---

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे लोकसहभागातून सुरक्षेकडे या संकल्पने अंतर्गत सार्वजनिक सुरक्षेकरीता पुणे शहरातील जास्तीत जास्त रस्ते, परिसर सीसीटीव्ही सर्व्हेलन्स खाली आणणेच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

त्याअंतर्गत श्री. राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांनी येरवडा पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रातील विविध आस्थापना, बँका, पेट्रोलपंप, सोसायट्या, नागरिक तसेच प्रतिष्ठीत नागरिक, चौकीचे हद्दीतील मिश्र वस्त्यांमधील सार्वजनिक मंडळांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांचेशी समन्वय साधून त्यांचे आजूबाजूचा परिसर व रस्ते सीसीटीव्ही सर्व्हेलन्सखाली येतील याकरीता उच्च प्रतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन करून प्रबोधन केलेले असून त्याकरीता पाठपुरावा सुरू आहे.

त्या अनुषंगाने येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील पांडू लमाण वस्तीमधील जीवन तरूण मंडळाने लोकसहभागातून त्यांचे वस्तीमधील प्रमुख चौक, रस्त्यांचा परिसर कव्हर होईल अशा रितीने एकूण ०६ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविले आहेत. सदर सीसीटीव्ही कॅमेरांचे उद्घाटनाचा कार्यक्रम आज दि. ०१/०५/२०१९ रोजी सायंकाळी १८:३० वा. ते १९:०० वा.चे दरम्यान श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे हस्ते पार पडला आहे. त्यावेळी श्री. राजेंद्र कदम, वरिष्ठ पो.निरी. यांनी सदर वस्तीमधील नागरिकांची बैठक घेऊन त्यांना सी.सी.टी.व्ही. कॅमेरांचे महत्व पटवून दिले व मा.पोलीस आयुक्त सो. पुणे यांनी नागरिकांकरीता सुरू केलेल्या एकूण १४ योजनांची माहिती दिली आहे.

अशा प्रकारे 'लोकसहभागातून सुरक्षेकडे' ही संकल्पना यशस्वीपणे राबविण्याचे मोहिमे अंतर्गत श्री. राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.





